**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २८९ । मंगळवार १८ ऑगस्ट २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainikaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# वैदूवाडीत मावा बनवणाऱ्यावर कारवाई

**एलसीबीकडून एक लाख ४४ हजारांचा मुद्देमाल जप्त**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सावेडी परिसरातील वैदूवाडी येथे बेकायदेशीरपणे सुगंधित तंबाखू आणि सुपारीचे मिश्रण करून मावा तयार करणाऱ्या ठिकाणावर स्थानिक गुन्हे शाखेने धाड टाकून १ लाख ४४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दोघांवर तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वाखाली पथक गस्त घालत असताना गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली. वैदूवाडीतील मातोश्री किराणा स्टोअरजवळ एका पत्र्याच्या खोलीत अवैध मावा तयार करून विक्री सुरूआहे.त्यानुसार पथकाने टाकलेल्या छाप्यात बबन रामा लोखंडे (वय ३२, रा. वैदवाडी, सावेडी) हा इलेक्ट्रिक मशीनवर मावा तयार करताना मिळून आला. त्याच्याकडून १ लाख २० हजार रुपयांचे मावा बनवण्याचे मशीन, १० हजार रुपयांचा तयार मावा, १४ हजार रुपयांची सुगंधित तंबाखू व सुपारीचा चुरा आणि प्लास्टिकच्या पुड्या असा एकूण १ लाख ४४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चौकशीत हा कच्चा माल मुकुंदनगर येथील मेहराज (पूर्ण नाव माहिती नाही, फरार) याने पुरवल्याचे उघड झाले. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


# मुकुंदनगरमध्ये निवासी भागात अनधिकृत 'नूर लॉन्स'चा गाजावाजा

**नागरिकांच्या तक्रारीनंतर प्रशासन ॲक्शन मोडमध्ये । मनपा नगररचना विभागाकडून तात्काळ वापर बंद करण्याची नोटीस**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मुकुंदनगर येथील सहारा सिटी भागातील निवासी आणि ॲमेनिटी स्पेसमध्ये अनधिकृतपणे 'नूर लॉन्स' नावाचे मंगल कार्यालय सुरू करून नागरिकांना त्रास देणाऱ्या चालक-मालकाला नगररचना विभागाकडून कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. या मंगल कार्यालयाचा वापर तात्काळ बंद न केल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशी नोटीस महापालिकेच्या नगररचना सहाय्यक संचालकांनी बजावली आहे.

सहारा सिटी, मुकुंदनगर येथील सर्वे नंबर ३३३/ १/ २/ ३३४/१/२ मधील ॲमेनिटी क्षेत्रात नूर मोहम्मद अबिद शेख यांनी विनापरवाना 'नूर लॉन्स' हे मंगल कार्यालय थाटल्याची तक्रार स्थानिक रहिवासी श्री. सय्यद हाफिजुद्दीन सय्यद राजा (रा. मुकुंदनगर) यांनी १ जून २०२६ रोजी दाखल केली होती. या मंगल कार्यालयामुळे मुख्य रस्त्यावर वाहनांची अस्ताव्यस्त पार्किंग होऊन वाहतूक कोंडी होत आहे. तसेच वाहने हटवण्यास सांगितल्यास नागरिकांना शिवीगाळ व दमदाटी केली जात ■ पान ४ वर




**प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष**

मुकुंदनगरमध्ये अनधिकृतपणे बांधलेल्या मंगल कार्यालयाने प्रशासनाची डोकेदुखी वाढवली आहे. रहिवासी भागात मोठे लग्न समारंभ पार पडत असल्याने रहिवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. महानगरपालिकेच्या वतीने नूर मोहम्मद आबीद शेख यांना नूर लॉन्सचा वापर करू नये असे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. तसेच आता या अँमिनिटी प्लॉटवर नूर लॉन्स म्हणून वापर केल्यास कारवाई करणार असल्याचेही महापालिकेने स्पष्ट केले आहे. सहारा सिटी येथे अनेक अनाधिकृत बांधकामे असल्याचे देखील सांगितले जात आहे.त्यामुळे अनधिकृत बांधकामांवर नूर लॉन्ससह येथीलअनधिकृत बांधकामांवर प्रशासन काय कारवाई करते, याकडे लक्ष लागले आहे.

# व्यापारी पतसंस्थेच्या उपाध्यक्षपदी अर्जुन हिवरकर यांची एकमताने निवड

**दैनिक आकर्षण । केशव कातोरे**




**बेलवंडी –** श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी येथील राष्ट्रीय सन्मान पारितोषिकासह विविध मानांकने प्राप्त केलेल्या बेलवंडी व्यापारी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या उपाध्यक्षपदी अर्जुन हिवरकर यांची एकमताने निवड करण्यात आली.

संस्थेचे माजी उपाध्यक्ष अरुण काळाणे यांनी वैयक्तिक कारणांमुळे आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने उपाध्यक्षपदाची जागा रिक्त झाली होती. या पदासाठी अर्जुन हिवरकर यांचा एकमेव अर्ज दाखल झाला. त्यांच्या अर्जाला युवराज पवार यांनी सूचक, तर दौलतराव भोसले यांनी अनुमोदक म्हणून साथ दिली. एकमेव अर्ज दाखल झाल्याने निवडणूक बिनविरोध पार पडली.

संस्थेचे अध्यक्ष ■ पान ४ वर



''संस्थेचे अध्यक्ष व सर्व संचालक यांना सोबत घेऊन संस्थेचा आजपर्यंतचा चोख कारभार पुढेही कायम ठेवत संस्थेच्या पारदर्शक कामकाजात भरीव योगदान देण्याचा माझा प्रयत्न राहील.''

**अर्जुन हिवरकर,**
नवनिर्वाचित उपाध्यक्ष

## ॲडीशनल एसपी वाकचौरे यांच्या नेतृत्वात श्रीरामपुरात अंमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियान



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**श्रीरामपूर –** अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलाचे अधिनस्त श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन च्या वतीने आयोजित अंमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियाना अंतर्गत विद्यार्थ्यांन/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये जनजागृतीसाठी दि. १८/०८/२०२६, १९/०८/२०२६ व दि. २०/०८/२०२६ अशा तीन दिवस विविध स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या आहे. या अभियानात श्रीरामपूर शहर व परिसरातील अनेक शाळा, विद्यालय, महाविद्यालय सामील झाले आहे. अभियानानिमित्त शालेय व महाविद्यालयीन स्तरावर निबंध स्पर्धा नुकत्याच नगर पोलीस अधीक्षक श्री. सोमनाथ वाघचौरे यांचे नेतृत्वाखाली व डी.वाय.एस.पी. श्री. जयदत्त भवर यांच्या सहकार्याने रयत शिक्षण संस्थेचे ■ पान ४ वर

## प्रत्यक्ष वस्तूस्थितीचा विचार करून दाळमंडई - आडतेबाजार परिसरात वाहनांवर होणारी दंडात्मक कारवाई थांबवा

**पालकमंत्री ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचेकडे मागणी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** गेल्या काही दिवसांपासून शहर वाहतूक नियंत्रण शाखा व परिवहन विभागाकडून अहिल्यानगर शहराची मुख्य बाजारपेठ असलेल्या दाळमंडई - आडतेबाजार परिसरात जीवनावश्यक वस्तू / माल घेऊन येणाऱ्या वाहनांवर वाहतूक कोंडीच्या कारणास्तव विविध नियम व कलमांन्वये होत असलेली आर्थिक दंडात्मक कारवाई ही प्रत्यक्ष वस्तू स्थितीचा विचार करून थांबवण्यात यावी अशी मागणी शहरातील रहदारी समस्यांचे अभ्यासक अभय ललवाणी यांनी पालकमंत्री ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

श्री ललवाणी यांनी निवेदनात पुढे म्हटले आहे की, वाहतूक कोंडीकरिता फक्त वाहनचालकांना जबाबदार धरणे व त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करणे ही बाब योग्य नाही. कारण वाहतूक कोंडीला ■ पान ४ वर

## मराठा समाजाला कुणबी मान्य करणे म्हणजे सामाजिक मूर्खपणा - लक्ष्मण हाके

**बीड । वृत्तसंस्था –** पश्चिम महाराष्ट्रात कुणबी नव्हते. मराठा समाजाला कुणबी मान्य करणे म्हणजे सामाजिक मूर्खपणा आहे. जरांगे पाटलांना आरक्षण द्यायचं म्हणून घटनादुरुस्ती केली गेली. ईडब्ल्यूएस आरक्षण असताना मनोज जरांगे पाटलांना ओबीसीमधून आरक्षण का देण्यात आले? त्यांना सगळी महत्त्वाची पदं पाहिजेत, ओबीसींचं काय? सगळ्या समाजातील घटकांना माझे आव्हान असेल ओबीसी म्हणून एक या आणि मुंबईकडे चला. आम्हाला कुणाबद्दल द्वेष नाही, जरांगे पाटलाचा आणि आमचा बांधाला बांध आहे का? जे संविधानाला सुप्रीम कोर्टाला मान्य नाही ते आरक्षण कशाला पाहिजे, असा सवाल ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी उपस्थित केला.

बीड येथे बोलताना हाके म्हणाले की, मनोज जरांगेनी आम्हाला आणि आम्ही त्यांना टार्गेट करायचं याचा महाराष्ट्रातल्या लोकांना कंटाळा आला आहे. जरांगेंनी आणखी आंदोलन केल्यास सर्व मराठे ओबीसीमध्ये येतील. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, स्वर्गीय उपमुख्यमंत्री ■ पान ४ वर

# शिक्षक नेते बाबासाहेब बोडखे यांचा आमदार अक्षय कर्डिले यांच्या हस्ते सत्कार

**माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या चेअरमनपदी व मुख्याध्यापकपदी पदोन्नतीबद्दल गौरव**
**शिक्षकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढणारे अभ्यासू नेतृत्व –आमदार अक्षय कर्डिले**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहमदनगर माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या चेअरमनपदी बिनविरोध निवड तसेच भुईकोट किल्ला परिसरातील पंडित नेहरू हिंदी विद्यालयाच्या मुख्याध्यापकपदी पदोन्नती झाल्याबद्दल शिक्षक नेते बाबासाहेब बोडखे यांचा आमदार अक्षय कर्डिले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सोमनाथ वामन, मयुर कराळे, ठाकूरदास परदेशी, सुभाष कराळे आदी उपस्थित होते.



आमदार अक्षय कर्डिले म्हणाले की, बाबासाहेब बोडखे यांनी शिक्षक संघटनेच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून शिक्षकांच्या विविध प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे. शिक्षकांचे प्रश्न शासन दरबारी प्रभावीपणे मांडून ते सोडविण्यासाठी त्यांनी सातत्यपूर्ण प्रयत्न केले आहेत. शिक्षकांच्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष करणारे, अभ्यासपूर्ण भूमिका मांडणारे तसेच प्रशासनाशी समन्वय साधून प्रश्नांची उकल करणारे प्रभावी नेतृत्व म्हणून त्यांनी जिल्ह्यासह राज्यात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

बोडखे हे अभ्यासू आणि उपक्रमशील व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित आहेत. माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या चेअरमनपदी त्यांची झालेली निवड ही संस्थेला अधिक प्रगतीच्या दिशेने घेऊन जाणारी ठरेल, असा विश्वास आमदार कर्डिले यांनी व्यक्त केला. तसेच पंडित नेहरू हिंदी विद्यालयाच्या मुख्याध्यापकपदी त्यांची झालेली पदोन्नती विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला निश्चितच चालना देईल, असेही त्यांनी सांगितले.

शिक्षक संघटनेतील कार्यासोबतच बाबासाहेब बोडखे यांनी सामाजिक बांधिलकीही जपली आहे. विशेषतः दिव्यांग, आर्थिकदृष्ट्या दुर्बल तसेच गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ते सातत्याने कार्यरत आहेत. अनेक गरजू विद्यार्थ्यांचे पालकत्व ■ पान ४ वर

# नगर-मनमाड रस्त्याच्या दुरावस्थेवर अजब आंदोलन!

**ट्रम्प यांच्या युद्धखोरीमुळे डांबर मिळत नसल्याचे म्हणत शिर्डीत अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष्यांना थेट पत्र**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शिर्डी–** अहिल्यानगर ते सावळी विहीर म्हणजेच नगर मनमाड महामार्ग हा गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला आणि टिका अनुभवणारा रस्ता मानला जातो गेल्या अनेक वर्षांपासून या महामार्गाची अतिशय दुरावस्था झाली असून अनेकांनी आपला जीव या रस्त्यावर अपघातात गमावला आहे. कधी ठेकेदार पळून जातो तर कधी कोणी या रस्त्याचे टेंडर घ्यायला नकार देतो.. जिल्ह्यात अनेक आमदार खासदार मंत्री सुद्धा असताना हा रस्ता पूर्ण कधी होईल असा सवाल विचारत विरोधक देखील सत्ताधाऱ्यांना कोंडीत पकडत आले आहेत.. काही दिवसांपूर्वी याच रस्त्याबाबत युवानेते डॉ सुजय विखे पाटील यांनी वक्तव्य करत आखाती देशातील युद्धजन्य परिस्थिती आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा लहरी स्वभाव यामुळे डांबराची उपलब्धता होत नसल्याबाबत म्हटल्याने आज राहता तालुका काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सचिन चौगुले



यांनी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह थेट शिर्डीतील पोस्ट ऑफिस मध्ये जात चक्क अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना पत्र लिहित नगर मनमाड महामार्गासाठी डांबर उपलब्ध करून देण्याची मागणी करत तुमच्या युद्धखोर स्वभावामुळे रस्त्यासाठी डांबर मिळत नाही आणि रस्ता पूर्ण होत नाही... त्यामुळेच आमच्या इथले लोक दारू सुद्धा प्यायला लागल्याचं पत्रात नमूद करत लवकरात लवकर डांबर उपलब्ध करुन देण्यात यावे अशी विनंती केली आहे तसेच डॉ सुजय विखे पाटील यांनी खरी वस्तुस्थिती जनतेसमोर आणल्याबद्दल त्यांचे देखील आभार मानले आहेत. काँग्रेसच्या वतीने उपरोधिकपणे केलेल अनोखं आंदोलन मोठा चर्चेचा विषय ठरला आहे.

## दै. आकर्षण निवडक

### कर्नल परबस् स्कुलमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**अहिल्यानगर-** देशभक्ती आणि उत्साहपूर्ण वातावरणात कर्नल परबस् स्कुल, अहिल्यानगर येथे स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यालयाच्या संस्थापिका सौ. गिता परब यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संचालक श्री. दिलीप परब, संचालक श्री. रिकीराज परब तसेच -च्या प्रमुख इन्चार्ज सौ. भावना शिंगवी यांची प्रमुख उपस्थिती होती. ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीताने वातावरण देशभक्तीमय झाले. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, नृत्य, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच विविध आकर्षक प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी -च्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत अप्रतिम लेझीम, देशभक्तीपर गीते, नृत्य व विविध प्रात्यक्षिके सादर केली. चिमुकल्यांच्या मनमोहक सादरीकरणाला उपस्थितांकडून विशेष दाद मिळाली. विद्यार्थ्यांच्या या उत्कृष्ट सादरीकरणातून शिस्त, आत्मविश्वास, संघभावना आणि राष्ट्रप्रेम यांचे दर्शन घडले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणासोबत क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम आणि शारीरिक प्रशिक्षणाला विद्यालयात विशेष महत्त्व दिले जाते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थापिका सौ. गिता परब संचालक श्री. दिलीप परब आणि श्री. रिकीराज परब, प्राचार्या, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच -च्या प्रमुख इन्चार्ज सौ. भावना शिंगवी आणि त्यांचे शिक्षक यांनी विशेष परिश्रम घेतले. उत्साहपूर्ण आणि देशभक्तीमय वातावरणात स्वातंत्र्य दिन सोहळा संपन्न झाला.



### संतोष मुनोत यांचे निधन

**अहिल्यानगर-** संतोष पोपटलाल मनोत ( बुह्राणनगरवाला) वय ५७ यांचे १६ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच नातेवाईक उपस्थित होते. के. जी. कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या कार्यालयीन अधीक्षक तथा महाविद्यालयाच्या कॅम्पस डायरेक्टर डॉ. स्वाती मुनोत यांचे संतोष हे पती तसेच सिद्धांत याचे वडील होत.



## श्रावणाच्या पहिल्या सोमवारी हरिहरेश्वर मंदिरात भक्तिमय उत्साह; ११ फुटी बाबा बर्फानीची आकर्षक प्रतिकृती

**ढोल–ताशांच्या गजरात भव्य पालखी प्रदक्षिणा; महाआरती व महाप्रसादाला भाविकांची मोठी गर्दी**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** श्रावण महिन्याच्या पहिल्या सोमवारनिमित्त बागरोजा हडको, दिल्ली गेट परिसरातील श्री हरिहरेश्वर महादेव मंदिरात हरिहरेश्वर मित्र मंडळ (ट्रस्ट)च्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त मंदिरात ११ फुटी बाबा बर्फानी (अमरनाथ) यांची आकर्षक बर्फाची प्रतिकृती व शिवलिंग साकारण्यात आले होते. या विशेष सजावटीचे दर्शन घेण्यासाठी सकाळपासूनच भाविकांनी मोठी गर्दी केली होती. मंदिर परिसरात 'हर हर महादेव'च्या जयघोषाने भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.



श्रावणाच्या पहिल्या सोमवारचे औचित्य साधून मंदिरातून भव्य पालखी प्रदक्षिणेचे आयोजन करण्यात आले. ढोल–ताशांच्या गजरात व भक्तिमय वातावरणात पालखी प्रदक्षिणा परिसरातून काढण्यात आली. या पालखी सोहळ्यात महिला, पुरुष तसेच तरुण–तरुणींनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. भक्तांनी फुलांची उधळण करत व हर हर महादेवचा जयघोष करत पालखीचे स्वागत केले. संपूर्ण परिसरात उत्साहाचे आणि धार्मिक वातावरण पाहायला मिळाले. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने पालखी प्रदक्षिणेत सहभागी होत भगवान हरिहरेश्वर महादेवाचे दर्शन घेतले.

यावेळी हरिहरेश्वर महादेवाची ५१ वी सोमवार महाआरती भक्तिभावाने पार पडली. त्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. दर सोमवारी हरिहरेश्वर मित्र मंडळाच्या वतीने महाआरती व महाप्रसादाचे आयोजन केले जाते. या धार्मिक उपक्रमास भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून श्रावण महिन्यात मंदिरात दर्शनासाठी भाविकांची विशेष गर्दी होत आहे. श्रावणाच्या पहिल्या सोमवारी साकारण्यात आलेली ११ फुटी बाबा बर्फानींची प्रतिकृती भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरली.

## जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे स्व.श्रीमती श्रीकंवरबाई लोढा यांच्या स्मरणार्थ मेंदू विकार तपासणी शिबिर



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** जैन सोशल फेडरेशनद्वारा संचलित आचार्य श्री आनंद ऋषीजी हॉस्पिटल येथे श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या १२६व्या जन्मदिनानिमित्त व स्व.श्रीमती श्रीकंवरबाई नारायणदास लोढा यांच्या समरणार्थ आणि सतीश व संजयकुमारजी लोंढा परिवार यांच्या वतीने मेंदू विकार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.त्याचे उदघाटन उदयोजक सतीश लोढा यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी संजयकुमार लोढा, उज्वला लोढा,सुनीता लोढा, सुमित लोढा, सौ भाग्यश्री लोढा, कुणाल लोढा, डॉ. वसंत कटारिया, डॉ. आशिष भंडारी, मानकचंद कटारिया गणेश कांकरिया, वसंत चोपडा, प्रेक्षा लोढा, तज्ज्ञ डॉ अद्वैत गीते ,डॉ वैशाली कदम ,डॉ स्नेहा म्हस्के आदीं उपस्थित होते.

यावेळी बोलताना उदयोजक सतीश लोढा म्हणाले कि आचार्य श्री आनंद ऋषीजी महाराज यांनी संपूर्ण जीवन मानवसेवा, अहिंसा, त्याग आणि करुणेचा संदेश देण्यासाठी समर्पित केले. या आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे काम करताना एक नवी ऊर्जा मिळते तसेच आपल्या हातून रुग्णसेवेचे काम होत असल्याने काम करण्यासाठी प्रेरणा मिळते .समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू रुग्णांना चांगल्या दर्जाची आरोग्यसेवा मिळणे ही आमची सामूहिक जबाबदारी आहे. आधुनिक वैद्यकीय उपचार दिवसेंदिवस प्रगत होत आहेत; मात्र या सुविधा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचणे तितकेच महत्त्वाचे आहे. आनंद ऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून विविध आरोग्यविषयक उपक्रम राबविले जात असून त्याचा लाभ अधिकाधिक नागरिकांना मिळावा, हा आमचा उद्देश असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

सौ भाग्यश्री लोढा म्हणाल्या की, आमचे आजोबा स्व नारायणदास मोहनलाल लोढा यांच्या जन्मजयंती निमित्त आमच्या लोढा परिवाराच्या वतीने या शिबिराचे आयोजन केले गेले आहे .या हॉस्पिटलची महिमा संपूर्ण भारतभर प्रचलित झाली आहे .आमच्या लोढा परिवाराला या ठिकाणी काम करण्याची संधी दिल्याबद्दल जेन सोशल फेडरेशन यांचे आभार मानते .

## श्रीरामपूरच्या दरोड्यातील फरार आरोपी कोपरगाव पोलिसांच्या हाती

**पो.नि संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**कोपरगाव–** माहेगाव देशमुख गावात मध्यरात्री संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या इसमाला कोपरगाव तालुका पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर त्याचा जुना गुन्हेगारी रेकॉर्ड तपासला असता तो श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या दरोड्याच्या गंभीर गुन्ह्यातील फरार आरोपी असल्याचे समोर आले. कार्तिक गुलाब निकम, रा. माहेगाव देशमुख, असे या आरोपीचे नाव असून त्याला पुढील कायदेशीर कारवाईसाठी श्रीरामपूर तालुका पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.दि. १६ ऑगस्ट २०२६ रोजी मध्यरात्री माहेगाव देशमुख परिसरात एक संशयित इसम बेकायदेशीर कृत्य करण्याच्या उद्देशाने फिरत असल्याची माहिती कोपरगाव तालुका पोलिसांना मिळाली. पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक कमलाकर चौधरी यांच्या नेतृत्वाखाली पथक तात्काळ माहेगाव देशमुख येथे रवाना झाले.पोलिसांचे पथक गावातील गणपती मंदिर परिसरात पोहोचले असता मंदिराच्या मागे एक इसम स्वतः चे अस्तित्व लपवताना दिसून आला. पोलिसांची चाहूल लागताच त्याने तेथून पळून जाण्याचा प्रयत्न केला.



मात्र पोलिसांनी मोठ्या शिताफीने त्याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने आपले नाव कार्तिक गुलाब निकम असल्याचे सांगितले. मात्र तो घटनास्थळी नेमका काय करत होता, याबाबत समाधानकारक माहिती न देता उडवाउडवीची उत्तरे देत होता. यानंतर पोलिसांनी त्याची अधिक चौकशी करून जुने गुन्हेगारी रेकॉर्ड तपासले असता धक्कादायक माहिती समोर आली. कार्तिक निकम हा श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा रजिस्टर क्रमांक १०२/२०२५ मधील दरोड्याच्या गुन्ह्यातील फरार आरोपी असल्याचे निष्पन्न झाले.

दि. १ मार्च २०२५ रोजी रात्री खानापूर, ता. श्रीरामपूर येथील ७९ वर्षीय विजयादेवी लक्ष्मणराव भोपळे यांच्या घरात सहा अनोळखी इसमांनी चोरटा प्रवेश केला होता. रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत आरोपींनी त्यांना कोयत्याचा धाक दाखवून तसेच त्यांचे तोंड दाबून घरातील व अंगावरील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा सुमारे ९ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल दरोडा टाकून लंपास केला होता. या गुन्ह्याच्या तपासादरम्यान कार्तिक निकमच्या साथीदारांना पोलिसांनी अटक केली होती. मात्र गुन्हा घडल्यापासून कार्तिक निकम हा फरार होता. अखेर कोपरगाव तालुका पोलिसांनी त्याला माहेगाव देशमुख येथून ताब्यात घेतल्याने श्रीरामपूर येथील दरोड्याच्या गुन्ह्याच्या तपासाला महत्त्वाची दिशा मिळाली आहे. दरम्यान, माहेगाव देशमुख येथे संशयास्पदरीत्या आढळून आल्याप्रकरणी कार्तिक निकम याच्यावर कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १२२ अन्वये कारवाई करण्यात आली. त्यानंतर पुढील कायदेशीर कारवाईसाठी त्याला श्रीरामपूर तालुका पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती आणि पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक कमलाकर चौधरी, पोलीस कॉन्स्टेबल रशिद शेख, प्रकाश नवाळी, सागर शेवाळे, चालक पोलीस कॉन्स्टेबल अनिल फाळके आणि होमगार्ड अमोल तासकर यांच्या पथकाने केली.

## न्यु आर्टस् महाविद्यालयात रंगनाथन जयंती उत्साहात

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** ग्रंथालय हे केवळ पुस्तकांचे भांडार नसून विद्यार्थ्यांच्या ज्ञानविकासाचे आणि व्यक्तिमत्त्व घडविण्याचे महत्त्वपूर्ण केंद्र आहे. विद्यार्थ्यांनी ग्रंथालयातील उपलब्ध ज्ञानसंपदेचा अधिकाधिक उपयोग करून आपल्या शैक्षणिक प्रगतीला नवी दिशा द्यावी, असे आवाहन न्यु आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी केले.



न्यु आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालयाच्या ग्रंथालयात ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त १२ ऑगस्ट रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांच्या हस्ते डॉ. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ग्रंथालयशास्त्राच्या क्षेत्रात डॉ. रंगनाथन यांनी केलेल्या महत्त्वपूर्ण कार्याचे स्मरण करून त्यांच्या ज्ञानविषयक योगदानाला अभिवादन करण्यात आले.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी तसेच ग्रंथालयातील विविध संदर्भग्रंथ, पुस्तके आणि अन्य ज्ञानस्रोतांचा प्रभावी वापर व्हावा, या उद्देशाने कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा विशेष गौरव करण्यात आला. गेल्या वर्षभरात महाविद्यालयीन ग्रंथालयातील ज्ञानसंपदेचा सर्वाधिक प्रभावी वापर करणाऱ्या कु. गीता तोडमल हिला 'बेस्ट युझर अवॉर्ड' देऊन गौरविण्यात आले. तसेच ग्रंथालयशास्त्र विषयातील नेट परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल चि. आकाश सांगळे याचा सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाच्या शैक्षणिक वातावरणात ग्रंथालयाचे महत्त्व अधोरेखित करताना उपस्थितांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमापुरते मर्यादित न राहता अवांतर वाचन, संदर्भग्रंथांचा अभ्यास आणि विविध ज्ञानस्रोतांचा उपयोग करावा, असे मत व्यक्त केले. डिजिटल युगात माहितीचे अनेक पर्याय उपलब्ध असले तरी प्रमाणित आणि दर्जेदार ज्ञानासाठी ग्रंथालयाचे महत्त्व कायम असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

## गोरेगावच्या रंगनाथ नरसाळेंच्या शिरपेचात मानाचा तुरा

**पोलिस सेवेतील उत्कृष्ट कामगिरीची केंद्र सरकारकडून दखल!**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर–** पारनेर तालुक्यातील गोरेगावचा सुपुत्र श्री. रंगनाथ जयराम नरसाळे यांचा गौरव; 'उत्कृष्ट सेवा पदक' आणि 'अति–उत्कृष्ट सेवा पदका'ने सन्मान गोरेगाव, ता. पारनेर : पारनेर तालुक्यातील गोरेगाव येथील सुपुत्र तथा महाराष्ट्र पोलिस दलातील कर्तव्यनिष्ठ अधिकारी श्री. रंगनाथ जयराम नरसाळे यांच्या प्रदीर्घ, निष्कलंक आणि उल्लेखनीय पोलिस सेवेला मानाचा मुजरा मिळाला आहे. भारत सरकारच्या गृह मंत्रालयाने पोलिस दलातील अधिकारी व अंमलदारांच्या दीर्घकालीन व उल्लेखनीय सेवेसाठी देण्यात येणाऱ्या 'उत्कृष्ट सेवा पदक' तसेच 'अति–उत्कृष्ट सेवा पदका'साठी त्यांची निवड केली आहे.

रंगनाथ नरसाळे यांनी पोलिस दलात कार्यरत असताना कर्तव्यनिष्ठा, शिस्त, प्रामाणिकपणा आणि उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली.



त्यांच्या प्रदीर्घ व निष्कलंक सेवेला मिळालेली ही पदके म्हणजे केवळ वैयक्तिक सन्मान नसून गोरेगावसह संपूर्ण पारनेर तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा मानला जात आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाच्या अधिसूचनेनुसार संबंधित कालावधीतील उल्लेखनीय सेवेसाठी त्यांना हे सन्मान जाहीर करण्यात आले आहेत. महाराष्ट्र पोलिस दलातील अधिकारी व अंमलदारांच्या गुणवत्तापूर्ण सेवेला प्रोत्साहन देण्यासाठी स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने अशा पदकांची घोषणा करण्यात येते.

**'गावाकडच्या मातीतून पोलिस दलात; कर्तृत्वाच्या जोरावर राष्ट्रीय सन्मान'**

गोरेगावसारख्या ग्रामीण भागातून पुढे येत पोलिस दलात आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या रंगनाथ नरसाळे यांच्या या यशामुळे परिसरातील युवकांसमोर कर्तव्य, प्रामाणिकपणा आणि मेहनतीचा आदर्श निर्माण झाला आहे. त्यांच्या सन्मानाची बातमी समजताच गोरेगाव तसेच पारनेर तालुक्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पोलिस सेवेत केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची केंद्र सरकारकडून दखल घेतली जाणे ही अभिमानाची बाब असून, रंगनाथ नरसाळे यांचे हे यश पारनेर तालुक्यातील नव्या पिढीसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.

## रिक्षाचालक–मालकांच्या विविध मागण्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर उपोषण

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा टॅक्सी चालक–मालक संघटनेच्या वतीने रिक्षाचालक–मालकांच्या विविध मागण्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर उपोषण सुरू करण्यात आले आहे. संघटनेचे कार्याध्यक्ष विलास कराळे पाटील यांच्या उपस्थितीत हे उपोषण सुरू करण्यात आले असून, शासनाने रिक्षाचालकांच्या प्रलंबित प्रश्नांकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी करण्यात आली आहे.

शहरात परवानगी नसलेल्या, स्क्रॅप झालेल्या तसेच इतर जिल्ह्यांतून आलेल्या रिक्षांकडून होत असलेली कथित बेकायदेशीर प्रवासी वाहतूक तातडीने बंद करावी, अशी प्रमुख मागणी संघटनेने केली आहे. अशा रिक्षांवर वाहतूक शाखा, प्रादेशिक परिवहन विभाग व पोलिसांनी संयुक्तपणे कारवाई करून बेकायदेशीर वाहतूक रोखावी, अशी मागणी करण्यात आली.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, अहिल्यानगर शहरात इतर जिल्ह्यांतील क्रमांकाच्या काही रिक्षा रात्रीच्या वेळेत मोठ्या प्रमाणात व्यवसाय करीत आहेत. काही रिक्षाचालकांकडून मद्यप्राशन करून वाहन चालविणे तसेच प्रवाशांची लूटमार करण्यासारखे प्रकार होत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. त्यामुळे अशा रिक्षांची तपासणी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

आरटीओतील कथित आर्थिक लूट थांबविण्याची मागणी

अहिल्यानगर प्रादेशिक परिवहन कार्यालयात वाहनधारकांची एजंटांच्या माध्यमातून कथित आर्थिक लूट होत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. वाहनधारकांची कामे थेट, पारदर्शक आणि विना–एजंट पद्धतीने करून द्यावीत. रिक्षाचालकांना विविध कामांसाठी एजंटांच्या माध्यमातून फिरण्याची वेळ येऊ नये, यासाठी स्वतंत्र व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली.

परवानाधारक रिक्षांच्या पासिंगसाठी बुधवार,



गुरुवार आणि शुक्रवार हे तीन दिवस निश्चित करून त्या दिवशी रिक्षाचालकांना मार्गदर्शन व मदत करण्यासाठी आरटीओतील अधिकारी–कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. रिक्षांसाठी ट्रकच्या रांगेपासून स्वतंत्र व्यवस्था करून पासिंगची प्रक्रिया सुलभ करावी, अशीही मागणी संघटनेने केली आहे.

मराठी भाषिक वाहनधारकांना कार्यालयीन कामकाजात कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये. परवाना व बॅच देताना नियमांचे काटेकोर पालन करावे आणि कोणत्याही गैरप्रकाराला थारा देऊ नये, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

रिक्षाचालक–मालकांच्या न्याय्य हक्कांसाठी संघटना सातत्याने लढा देत राहणार असून, त्यांच्या प्रश्नांना न्याय मिळेपर्यंत शासनदरबारी पाठपुरावा सुरू ठेवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. यासंदर्भात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडेही निवेदनाद्वारे मागण्या मांडण्यात आल्या आहेत.

यावेळी गणेश आटोळे, अशोक औशीकर, फारुक शेख, अन्वर शेख, बाळासाहेब साळवे, वसंत कोकाटे, प्रकाश तोरणमल, सुधाकर साळवे, दत्ता वामन, नासिर खान, सतीश मेंगाळ, अनिल वैरागर, सचिन जाधव, अशोक राहीन, रवींद्र कर्डक, विलास मिसाळ, गोरख आंबेकर, पोपट कांडेकर, दिलीप गायकवाड, दीपक गहिले, जुनेद बागवान, किशोर कुलट यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शासकीय निमशासकीय सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी २३ रोजी आरोग्यविषयक मार्गदर्शन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी, कर्मचारी मध्यवर्ती संघटनेतर्फे सेवानिवृत्त अधिकारी कर्मचार्यांसाठी अहिल्यानगर जिल्हा शाखा आयोजित आरोग्य उपक्रम दि. २३ रोजी (रविवार) 'आरोग्यदायी माय मराठी' कार्यक्रमांतर्गत 'चालता–बोलता, उठता–बसता स्वतःच स्वतः वर उपचार करा' विषयावर एकदिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेत संघटनेचे जास्तीत जास्त सभासद व नागरिकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

रविवारी (दि. २३) नगर शहरातील सावेडी भागातील पाईपलाईन रस्त्यावरील रेणावीकर कॉलनी येथील पेट्रोलपंपासमोर असलेल्या श्रीकृष्ण हॉलमध्ये सकाळी ९ ते दुपारी ५ वाजेपर्यंत होणार आहे. या कार्यशाळेत कंबरदुखी, पाठदुखी, गुडघेदुखी, मायग्रेन, डोकेदुखी, मानसिक ताणतणाव, शुगर, बी.पी.ई. यांसारख्या आजारांवर निसर्गोपचार व शब्दोपचाराच्या सहाय्याने उपचार करण्यात येणार आहेत. याचे प्रात्यक्षिक व स्पष्टीकरण शब्दोपचार थेरपिस्ट श्री. दीपक मानकर, केंद्रप्रमुख तथा मुख्याध्यापक (से.नि.) मनपा, नाशिक हे करणार आहेत.

'आरोग्यदायी माय मराठी' उपक्रमांतर्गतचा कार्यक्रम सावेडी भागातील पाईपलाईन रस्त्यावरील रेणावीकर कॉलनी येथील पेट्रोलपंपासमोर असलेल्या श्रीकृष्ण हॉलमध्ये सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत होणार आहे. यासाठी कृतिशील संघटना सभासद व पती/पत्नीसाठी प्रत्येकी ५०० रुपये शुल्क आणि सभासदांव्यतिरिक्त नागरिकांसाठी ७०० रुपये शुल्क आकारण्यात येणार आहे, अशी माहिती देण्यात आली.

नोंदणी केलेल्या व्यक्ती समक्ष येऊन 'आरोग्यदायी माय मराठी' उपक्रम केंद्रातील तज्ज्ञ व्यक्तींशी चर्चा करून त्यांना अपेक्षित मार्गदर्शन मिळवू शकतील. या उपक्रमात जास्तीत जास्त सभासद व नागरिकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन संघटनेचे पदाधिकारी सर्वश्री चंद्रकांत दळवी, दिलीप थिटे, नागनाथ बोल्ली, अभियंता व्यंकटराव गायकवाड, अभियंता मनोहर पोकळे, अभियंता रामदास साळी आदिंसह इतरांनी केले आहे. सहभाग व अधिक माहितीसाठी अभियंता रामदास साळी (मोबाईल ९४२०६३२४३९), अभियंता सुनिलदत्त गायकवाड (९८९०१३३३४१), अभियंता प्रकाश अकोलकर (९४२१४३८९९९), सुधाकर रामदिन (९६७३३२९६६५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. श्री. दीपक मानकर हे निसर्गोपचार तज्ज्ञ आहेत. 'मराठी भाषा आरोग्यदायी आहे' विषयावर आधारित त्यांची सात पुस्तके प्रकाशित झाली आहेत. ऊशशरिज्ञ धेसर रपव चशवळींरींळेप नावाने त्यांचे स्वतःचे यु–ट्यूब चॅनल आहे. यु–ट्यूब चॅनल सबस्क्राईब केल्यावर किमान २१० व्हिडिओ पाहवयास मिळतील.


आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)


## दै. आकर्षण निवडक

### योगी गेंडानाथजी महाराज पुण्यस्मरणार्थ भक्तिगीत गायन स्पर्धा



अहिल्यानगर- नगर शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिराचे महंत परमपूज्य योगी गेंडानाथजी महाराज यांच्या २८ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्ताने नगर शहरात स्वरबहार फाऊंडेशनच्या वतीने जिल्हास्तरीय भक्तिगीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ९ ते १७ (लहान गट) व १७ पासून पुढे (खुला गट) अशा २ वयोगटामध्ये या स्पर्धा घेतल्या जाणार आहेत. स्पर्धेचे यंदाचे १५ वे वर्ष आहे. शनिवार दि. ५ सप्टेंबर रोजी अहील्यानगरमध्ये टिळकरोडवर असलेल्या लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे या स्पर्धा होणार असल्याचे फाऊंडेशनचे अध्यक्ष राजेंद्र टाक यांनी कळविले आहे. सकाळी ठीक ९:३० वा. या स्पर्धेस प्रारंभ होणार आहे. पहिल्या सत्रात लहान गट तर दुपार नंतरच्या सत्रात खुल्या गटाच्या स्पर्धा घेतल्या जातील. सायंकाळी लगेचच पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम होणार आहे. सहभागी स्पर्धक वादक शिक्षक पालक याकरिता दुपारी प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. लहान गटामध्ये अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाकरिता रू. २००१/-, १५०१/- ,१००१/- तर रू. २५१/- रुपयांची उत्तेजनार्थ २ पारितोषिके दिली जाणार आहेत. तर मोठ्या गटाकरिता प्रथम क्रमांकाकरिता रू. ५१००/- द्वितीय क्रमांक रू. ३१००/- तृतीय क्रमांक रू. २१००/- रोख व स्मृतीचिन्ह तर ५००/- रुपयांची २ उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात येणार आहेत. विजेत्यांना स्मृतिचिन्ह तर स्पर्धेतील प्रत्येक सहभागी स्पर्धकास प्रमाणपत्र दिले जाणार आहे. मोठ्या गटाकरिता रू. ३०० /- तर लहान गटाकरिता रू. १००/- इतकी प्रवेश फी आकारण्यात येणार असून स्पर्धकाने वैयक्तिकरित्या अभंग, भक्तिगीत, गवळण, हिंदी भजन आदी गीतप्रकारातील कुठलेही १ गीत सादर करावयाचे आहे. सादरीकरणासाठी एकूण ५ मिनिटे एवढा अवधी दिला जाणार आहे. साथ संगत सोबत आणल्यास उत्तम. नसल्यास संयोजकांच्या वतीने वाद्य आणि वादकांची व्यवस्था करण्यात आली आहे. स्पर्धेकरिताचे प्रवेश अर्ज आर टी ऑडिओ व्हिडिओ स्टुडिओ, कैलास टॉवर, आझाद चौक, घुमरे गल्ली, अहिल्यानगर येथे उपलब्ध आहेत. अधिक माहितीकरिता राजेंद्र टाक मोबाईल नंबर ९४२२२२०८७५ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### माळीवाडा येथील सावता महाराज उत्सव समिती आयोजित सप्ताहाचा समारोप



अहिल्यानगर- भगवंतांची भक्ती हा मुक्तीचा मार्ग आहे, भगवंतांचे नामस्मरणाने जीवनातील दुःख नाहिसे होत असतात. त्यासाठी आपल्या संतांनी भक्तीचे अनेक मार्ग सांगितले आहेत, त्या मार्गाने आपण गेल्यास दुःख कमी होऊन जीवनात आनंद निर्माण होत असतो. अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायणाने आपणामध्ये एक अंतरिक उर्जा निर्माण होत असल्याने अशा सप्ताहांची आज खरी गरज आहे. त्यामुळे प्रत्येकाने पारायण केले पाहिजे. भगवंतापर्यंत पोहचण्याचा तो एक सोपा मार्ग आहे, असे मौलीक विचार हभप राम महाराज खरवंडीकर यांनी केले. माळीवाडा येथे श्री सावता महाराज उत्सव समिती आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाच्या समारोपप्रसंगी काल्याची दहीहंडी फोडताना हभप राम महाराज खरवंडीकर समवेत याप्रसंगी उत्सव समितीचे प्रमुख छबुनाना जाधव ,देवस्थान चे उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे ,भगवान फुलसोंदर , विजय कोथिंबिरे , केलास खरपुडे ,सतीश डागवाले ,बाळासाहेब पुंड ,दत्ता गाडळकर ,दत्ता जाधव ,सुभाष राऊत ,अनिल चेडे ,चंद्रकांत ताठे ,अशोक कानडे,सोमनाथ नागपुरे ,विष्णू म्हस्के ,बाळासाहेब रडे , पांडुरंग नन्नवरे ,नितीन पुंड , बजरंग भुतारे अमोल धाडगे ,नितीन शेरकर ,रमेश बनकर ,विकास पटवेकर ,शन्कर वाघमारे ,विनायक आंबेकर ,आदि उपस्थित होते. याप्रसंगी छबूनाना जाधव म्हणाले, संत-महात्म्यांचे विचार हे आपल्या जीवनात महत्वाचे आहे. त्यासाठी दरवर्षी अखंड हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून भक्तीयोग साधण्याचा प्रयत्न करत असतो. सप्ताहांतर्गत नामवंत किर्तनकारांची कीर्तन सेवा गेल्या सप्ताहभर आयोजित कार्यक्रमातून भक्तीमय वातावरण निर्माण झाले. गेल्या सप्ताहाभरापासून सुरु असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह ,पारायण सोहळा ,हरीपाठ ,भजन आदींनी परिसरात चैतन्य निर्माण झाले होते. दरवर्षी आयोजित केलेल्या सप्ताहास प्रतिसाद वाढत आहे ही आमचे भाग्यच म्हणावे लागेल.

# शिवछत्रपतींची न्यूयॉर्कमध्ये मिरवणूक; छत्रपती फाउंडेशनतर्फे आयोजन







**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने यावर्षी १६ आगस्ट ला इंडीया डे परेड चे आयोजन न्युयॉर्क मध्ये यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांचा कीर्तिरथ छत्रपती फाऊंडेशनच्या वतीने सादर करण्यात आला.

सह–आयोजक: किर्तीरथासोबत जल्लोश ढोल ताशा पथकाच्या ५० हुन अधिक वादकांनी न्यूयॉर्क शहर दुमदुमून टाकले. सह–आयोजक: जगप्रसिद्ध रुद्रा डान्स ग्रुप च्या मुलींनी अनेक लोकनृत्ये सादर केली. लिविंगस्टनचा राजा ग्रुपच्या नववारी लुगड्यात नसलेल्या युवतींनी लेझीम नृत्य सादर करत रस्त्याच्या दुतर्फा जमलेल्या समुदायाचे मन जिंकले.

सह–आयोजक: महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभाग तसेच मराठी भाषा मंत्रालयाच्या आंतरराष्ट्रीय मराठी मंचाचे मदत होती. परेड ग्रँड मार्शल चा मान न्यूयॉर्क राज्याच्या गव्हर्नर कॅथी होचल यांना देण्यात आला. होचल यांनी न्यूयॉर्कच्या विकासात भारतीय समुदायाचे योगदान अत्यंत महत्वाचे असल्याचे प्रतिपादन केले बॉलीवूड अभिनेत्री पूजा हेगडे तसेच हिंदी मालिका तारक मेहता का उलटा चश्मा ची संपूर्ण टीम उपस्थित होती.

मिशीगन राज्याचे हाऊस ऑफ रेप्रेसेंटेटीव्ह (खासदार) श्री श्री ठाणेदार ह्यांची पूर्णवेळ कीर्तीरथावर विशेष अतिथी म्हणून उपस्थिती. त्यांनी रथावरून रस्त्याच्या दुतर्फा जमलेल्या प्रचंड जनसमुदायाला अभिवादन केले तसेच परेड स्टेजवरून परेडचे निरीक्षण केले. मागच्या वर्षी सुद्धा मी उपस्थित होतो, परेडमधील आपल्या सांस्कृतिक आणि इतिहासाचं प्रदर्शन तसेच तरुण पिढीचा उत्साही सहभाग बघून मी गहिवरून गेलो. त्यामुळे ह्यावर्षी आवर्जून ह्यावेळी मी परेडची वाट बघत होतो.

श्री ठाणेदार ह्यांनी शिवाजी महाराज हे सर्वोत्तम स्ट्रॅटेजिस्ट होते. त्यांचे गुण, त्यांची न्याय्य वृत्ती, त्यांच्यातील उद्योजकता आजही अत्यंत प्रेरणादायी आहे. शिवरायांच्या चरित्रातून अनेक धडे आजच्या युवकांनी घ्यावे असे आव्हाहन करीत त्यादिशेने छत्रपती फाऊंडेशन काम करीत असल्याबद्दल अभिनंदन केले. न्यू हॅम्पशायर राज्याचे स्टेट रिप्रेझेन्टेटिव्ह (आमदार ) श्री संतोष साळवी हयांची विशेष अतिथी म्हणून उपस्थिती.

भारताचे न्यूयॉर्क येथील उप–राजदूत श्री विशाल हर्ष व वाणिज्य दूत श्रीमती राजलक्ष्मी कदम ह्यांनी छत्रपती फाऊंडेशन सोबत अनेक वर्षांपासून असलेले सहकार्य भविष्यात अधिक वृद्धिंगत होण्याबाबत प्रयत्न करण्याची आशा व्यक्त केली. यावर्षी विशेष म्हणजे भारतीयानासोबत मोठ्या प्रमाणावर स्थानिक लोकांचा तसेच विविध देशांमधून आलेल्या लोकांचा लक्षणीय सहभाग होता. अनेक प्रतिक्रियांमधून त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यदिवसाबाद्दल शुभेच्छा दिल्या. परेड मध्ये सादर केलेले ढोल–ताशा, संगीत, पारंपारिक पोषाख, नृत्ये व ऐतिहासिक दृश्याचे कौतुक केले. अत्यंत आनंददायी वातावरणात सगळ्यांनी परेडचा आनंद लुटला रथावर शिवाजी महाराज, जिजाऊ, बाल शिवबा व मावळ्यांची भूमिका सादर.. बालक, महिला व युवकांनी दिमाखदार अभिनय व आकर्षक पोशाखाद्वारे ऐतिहासिक क्षण जिवंत केले. १०० हुन अधिक लोकांनी महाराष्ट्राचा इतिहास व संस्कृतीचे भव्य प्रदर्शन सातासमुद्रापार केले. महाराष्ट्रातील लोककलेचा आगळावेगळा अनुभव अमेरिकेतल्या लोकांना दिला अमेरिकेत वास्तव्यास असलेले सर्व प्रांतातील भारतीय लोक या परेड मधे मोठ्या उत्साहात सहभागी झाले

विशेष: उद्योग व करिअर चर्चासत्र: छत्रपती फाऊंडेशन संलग्न हॉस्पिटॅलिटी व क्षेत्रातील २० कंपनीचे संस्थापक, सीईओ, सीटीओ ह्यांसोबत काँग्रेसमन श्री ठाणेदार व रिप्रेझेंटेटिव्ह संतोष साळवी ह्यांची चर्चासत्रात सहभाग घेतला. ह्यावेळी दोघांनी स्वतः महाराष्ट्रातुन सुरुवात करत आपण कसे स्वतः अमेरिकेत येऊन उद्योग सुरु केला ह्याचा अनुभव सांगितला. छत्रपती फाऊंडेशनच्या सदस्यांनी सुरु केलेल्या कंपनीमध्ये आज शेकडो रोजगार ऊपलब्ध करून दिल्याबद्दल अभिनंदन केले. त्याचबरोबर समाजातील युवकांना मोठ्या प्रमाणावर उद्योगात मदत करण्यासाठी स्वतः वेळ आणि पैसा उभा करण्याचे वचन श्री ठाणेदार व श्री साळवी ह्यांनी दिले. सध्यस्थितीत नोकरीत असलेल्या लाखो मराठी युवकांना व्हिसा धोरणाचा तसेच मुळे आलेल्या बदलांचा एकत्र सामना करावा लागत आहे. विशेषतः: शैक्षणिक कर्ज काढून आलेल्या अनेक विध्यार्थ्यांना भविष्यातील नोकरीबद्दल चिंता हा प्रमुख मुद्दा सदस्यांनी मांडला. त्यावर सीईओ नी मार्गदर्शन तसेच मदत करण्याचे आवाहन केले प्रचंड उत्साहात हजारो भारतीय तसेच अमेरिकन नागरिकांच्या जल्लोशात जगाची आर्थीक राजधानी न्यूयॉर्क मधील प्रशस्त मॅडिसन अव्हेन्यू हा भगवामय झाला होता

मुख्यतः विध्यार्थी व तरुणांच्या नेतृत्वात छत्रपती फाऊंडेशन न्यूयॉर्क ही संस्था गेल्या १५ वर्षांपासून न्यूयॉर्क मध्ये शिवजयंती, जिजाऊजयंती, अहिल्यादेवी जयंती, आंबेडकर जयंती च्या माध्यामातून अनेक सांस्कृतिक उपक्रम राबवत असते. यावर्षी संस्थेतर्फे न्यूयॉर्कस्थित भारतीय दूतावासात शिवजयंतीचे आयोजन केले होते. फौंडेशनच्या वीवीध उपक्रमात या उपक्रमामुळे अजुन एक माणाचा तुरा खोवला गेला आहे .

फेडेरेशन ऑफ इंडियन असोशिएशन्स ह्या संस्थेतर्फे दरवर्षी इंडिया डे परेडचे आयोजन केल्या जाते कीर्तीरथाच्या भरदस्त आयोजनासाठी छत्रपती फाऊंडेशन च्या १० राज्यातून आलेल्या सदस्यांनी अपार मेहनत घेतली. छत्रपती फाउंडेशन, न्यूयॉर्क, अमेरिका

## पुणे–अहिल्यानगर रेल्वेमार्गाचे अंतिम स्थान सर्वेक्षण पूर्ण

### खासदार नीलेश लंके यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगरच्या रेल्वे कनेक्टिव्हिटीच्या दृष्टीने महत्त्वाची घडामोड समोर आली असून, पुणे–अहिल्यानगर या १३४ किलोमीटरच्या नवीन रेल्वेमार्गाचा अंतिम स्थान सर्वेक्षणपूर्ण झाला आहे. तसेच या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल () तयार करण्यात आला आहे. दुसरीकडे, छत्रपती संभाजीनगरअहिल्यानगर या ११० किलोमीटरच्या नवीन रेल्वेमार्गासाठी ला मंजुरी मिळाली आहे. या दोन्ही प्रकल्पांसाठी खासदार नीलेश लंके यांनी २०२४ पासून सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यामुळे महत्त्वाचे यश मिळाल्याचे मानले जात आहे.

खासदार म्हणून निवडून आल्यानंतर लंके यांनी अहिल्यानगरच्या रेल्वे कनेक्टिव्हिटीचा प्रश्न सातत्याने केंद्र सरकारच्या पातळीवर लावून धरला. केवळ पत्रव्यवहारापुरता पाठपुरावा न करता लोकसभेच्या सभागृहात अनेकदा या मागणीला वाचा फोडली. तसेच रेल्वे मंत्रालयाशी संबंधित बैठका आणि रेल्वे समितीच्या बैठकींमध्ये सक्रिय सहभाग घेत प्रकल्पांची सद्यस्थिती, सर्वेक्षण, डी पी आर आणि पुढील कार्यवाहीचा आढावा घेतला.

पुणे–अहिल्यानगर रेल्वेमार्गाचे अंतिम स्थान सर्वेक्षण पूर्ण होणे हा प्रकल्पाच्या पुढील प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. सर्वेक्षण पूर्ण झाल्याने प्रकल्पाच्या प्रशासकीय व मंजुरी प्रक्रियेला पुढे जाण्यास आवश्यक असलेली दिशा स्पष्ट झाली आहे. या मार्गामुळे अहिल्यानगरला पुणे शहराशी अधिक सक्षम रेल्वे संपर्क मिळण्यास मदत होणार आहे.

त्याचबरोबर छत्रपती संभाजीनगर–अहिल्यानगर ११० किलोमीटरच्या नवीन रेल्वेमार्गासाठी अंतिम स्थान सर्वेक्षणाला मंजुरी मिळाल्याने या प्रकल्पाच्या पुढील प्रक्रियेलाही गती मिळण्याची अपेक्षा आहे. अंतिम स्थान सर्वेक्षणच्या आधारे पुढील टप्प्यात डीपीआर आणि आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

खासदार निलेश लंके म्हणाले, अहिल्यानगरच्या रेल्वे कनेक्टिव्हिटीचा प्रश्न हा केवळ वाहतुकीचा विषय नसून जिल्ह्याच्या आर्थिक, औद्योगिक आणि सामाजिक विकासाशी निगडित आहे. २०२४ मध्ये खासदार झाल्यापासून पुणे–अहिल्यानगर आणि छत्रपती संभाजीनगर–अहिल्यानगर रेल्वेमार्गांसाठी सातत्याने पाठपुरावा करत आहे. लोकसभेत हा विषय अनेक वेळा मांडला तसेच संबंधित बैठका आणि रेल्वे समितीच्या माध्यमातून या प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेतला. पुणे–अहिल्यानगर रेल्वेमार्गाचा अंतिम स्थान सर्वेक्षण पूर्ण झाल्याची आणि छत्रपती संभाजीनगर–अहिल्यानगर रेल्वेमार्गाच्या अंतिम स्थान सर्वेक्षणला मंजुरी मिळाल्याची माहिती अहिल्यानगरच्या जनतेसाठी समाधानाची बाब आहे. मात्र, हा प्रवास येथे थांबणार नाही. प्रत्यक्ष रेल्वेमार्गाचे काम सुरू होऊन त्याचा लाभ जनतेला मिळेपर्यंत पाठपुरावा सुरूच राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, अहिल्यानगरच्या रेल्वे विकासासाठी इतर महत्त्वाचे प्रकल्पही सुरू आहेत. दौंडमनमाड २३६ किलोमीटर रेल्वेमार्गाचे दुहेरीकरण पूर्ण होऊन ते कार्यान्वित झाले आहे. त्यामुळे या मार्गावरील रेल्वे वाहतुकीची क्षमता वाढण्यास मदत होणार आहे. अहिल्यानगरबीडपरळी वैजनाथ या २६१ किलोमीटरच्या नवीन रेल्वेमार्गाच्या अहिल्यानगर–बीड–बडवाणी या २०१ किलोमीटरच्या भागाचे काम सुरू असून, प्रकल्पाच्या उर्वरित कामातही प्रगती होत आहे. या प्रकल्पाची किंमत सुमारे ५,८०० कोटी रुपये आहे. याशिवाय धाराशिव–बीड–छत्रपती संभाजीनगर या २४० किलोमीटरच्या नवीन रेल्वेमार्गासाठीही अंतिम स्थान सर्वेक्षणला मंजुरी देण्यात आली आहे. पुणे, छत्रपती संभाजीनगर, मराठवाडा तसेच राज्यातील प्रमुख शहरांशी अहिल्यानगरची सक्षम रेल्वे जोडणी झाल्यास प्रवासी वाहतुकीसोबतच शेतमाल वाहतूक, व्यापार–उद्योग, रोजगारनिर्मिती आणि जिल्ह्याच्या आर्थिक विकासाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

अहिल्यानगरच्या रेल्वे विकासासाठी दिल्लीपासून स्थानिक पातळीपर्यंत प्रत्येक स्तरावर पाठपुरावा सुरू आहे. लोकसभेत आवाज उठविण्यापासून संबंधित समित्या आणि मंत्रालयाच्या बैठकींपर्यंत उपलब्ध प्रत्येक संधीचा उपयोग करून अहिल्यानगरला हक्काची आणि सक्षम रेल्वे कनेक्टिव्हिटी मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरूच ठेवणार आहे, असा निर्धार खासदार लंके यांनी व्यक्त केला.

## संवादातून सुविधेकडे, खुल्या मंचावर कोपरगावकरांनी मांडले विकासाचे व्हिजन

### ‘प्रथमच नगरपरिषद कार्यक्षेत्रात अशा खुला चर्चेचा अनोखा उपक्रम’

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**



**कोपरगाव–** कोपरगाव शहरासह मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि मूलभूत समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी व्हिजन कोपरगाव मंचच्या पुढाकाराने संवादातून सुविधेकडे या विशेष संवाद कार्यक्रमाचे आयोजन रविवारी १६ ऑगस्ट रोजी कोपरगाव शहरातील कृष्णाई बँक्वेट हॉल येथे करण्यात आले होते. शहरातील सुशिक्षित वर्ग, उद्योजक, डॉक्टर, वकील, इंजिनिअर आणि व्यापाऱ्यांनी या बैठकीला मोठ्या संख्येने उपस्थित राहून कोपरगावच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण सूचना मांडल्या. विजन कोपरगावच्या या संवाद कार्यक्रमात विधान परिषदेचे आमदार विवेक कोल्हे यांचा सत्कार करण्यात आला तसेच या कार्यक्रमाला कोपरगावचे नगराध्यक्ष पराग यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

पहिल्या सत्रात बाजारपेठेवर चर्चा झाली त्यात अशोक कोठारी संजय बंब, संजय भन्साळी, सुधीर डागा,नितीन भुसारे,दीपक विसपुते यांनी तज्ञ म्हणून आपले विचार मांडले. दुसऱ्या सत्रात पायाभूत सुविधांवर प्रकाश टाकण्यात आला या चर्चेसाठी डॉ.डी.एस. मुळे,राजेश ठोळे, डॉ.राजेंद्र श्रीमाळी,प्रसाद नाईक,संतोष भट्टड, प्रा.रियाज शेख,प्रा. वृंदा कोऱ्हाळकर यांनी संवाद साधला. या बैठकीत उपस्थित मान्यवरांनी शहरातील दैनंदिन अडचणी आणि बाजारपेठेच्या सद्यस्थितीवर सविस्तर चर्चा केली, बाजारपेठेतील वाहतूक कोंडी रोखण्यासाठी पार्किंग व्यवस्थेचे नियोजन करणे, मुख्य रस्त्यांचे रुंदीकरण, खड्डे मुक्त रस्ते, मोकाट जनावरांचा प्रश्न मार्गी लावणे, रस्ते बांधकाम करताना प्रॉपर ट्रीटमेंटने रस्ते बनवावे, विकास कामे करताना चांगल्या दर्जाचे करावे, कोपरगावात बाजारपेठ हलवण्यासाठी नवनवीन उद्योगांना चालना द्यावी, युवा व्यापाऱ्यांसाठी मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन करावे, पर्यटनासाठी सुविधा उपलब्ध कराव्यात अशा अनेक गोष्टींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. पिण्याच्या पाण्याचा नियमित पुरवठा, ड्रेनेज लाईनची दुरुस्ती आणि स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम करण्याची मागणी डॉक्टर्स व अभियंत्यांनी केली. स्थानिक उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि नवीन व्यवसायांना चालना देण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा पुरवण्याचे आवाहन व्यापाऱ्यांनी केले.

संवाद कार्यक्रमादरम्यान बोलताना आमदार विवेक कोल्हे म्हणाले, ‘‘कोपरगाव शहराला सुसज्ज आणि आधुनिक बनवण्यासाठी प्रत्येक घटकाचे योगदान महत्त्वाचे आहे. नागरिकांनी मांडलेले प्रश्न केवळ कागदावर न राहता, त्यावर टप्प्याटप्प्याने ठोस उपाययोजना केल्या जातील यासाठी ही चर्चा महत्वाची ठरणार आहे. तसेच चार महिन्यानंतर डिसेंबर महिन्यात पुन्हा एकदा अशा पद्धतीने संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे आवाहन देखील विवेक कोल्हे यांनी आयोजकांना केले.

नगराध्यक्ष पराग संधान यांनीही नगरपरिषदेच्या वतीने शहरातील सर्व प्रलंबित कामे वेळेत पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. काही काळ रस्त्यांची कामे विलंब होतील कारण भूमिगत गटारीची कामे सुरू आहे त्यामुळे पुन्हा रस्ता खोदावा लागू नये यासाठी उशीर होतो आहे. मोकाट जनावरांसाठी नगरपरिषद गोशाळा उभारत असून हा प्रश्न देखील आता सुटण्याच्या उंबरठ्यावर आला आहे.या उपक्रमामुळे नागरिक आणि लोकप्रतिनिधींमधील दुवा अधिक घट्ट झाला असून, कोपरगावच्या विकासाला नवी दिशा मिळेल असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

## सीताराम सारडा विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** हिंदसेवा मंडळ संचलित सीताराम सारडा विद्यालय व प्राथमिक शाळा, बागडपट्टी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे उद्योजक पराग धूत व ज्येष्ठ शिक्षिका सुलभा कुलकर्णी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.याप्रसंगी हिंदसेवा मंडळाचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी,सीताराम सारडा विद्यालयाचे चेअरमन अजित बोरा,प्राथमिक शाळेचे चेअरमन मधुसूदन सारडा, संजय मुदगल,मुख्याध्यापिका मंगला डोळस, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे,रविंद्र चोभे,दिपक आरडे, अमोल कदम,शिक्षक प्रतिनिधी विनोद जोशी, सौ. निमा राहींज,गोवर्धन पांडुळे आदींसह शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तंत्रज्ञानाचा योग्य वापर करा – पराग धूत

यावेळी बोलताना पराग धूत म्हणाले, ‘‘सध्या जग वेगाने बदलत आहे. मोबाईल आणि इंटरनेट आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग झाले आहेत. मोबाईल आपल्याला माहिती देऊ शकतो, पण विचार आपल्याला स्वतः करावे लागतील. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर शिक्षणासाठी करावा, पण वेळ वाया घालवण्यासाठी करू नये. शिका, विचार करा आणि चांगले कर्म करा. उद्याचे भविष्य हे विद्यार्थ्यांच्याच हातात आहे. मोठी स्वप्ने पहा,मेहनत करा, कधीही हार मानू नका. शिक्षित,स्वच्छ आणि मजबूत भारत आपण सर्वांनी मिळून घडवूया.‘‘

स्वातंत्र्य सहजासहजी मिळालेले नाही – सुलभा कुलकर्णी

ज्येष्ठ शिक्षिका सुलभा कुलकर्णी म्हणाल्या, ‘‘भारताला स्वातंत्र्य सहजासहजी मिळालेले नाही. अनेक हुतात्म्यांनी देशासाठी बलिदान दिले आहे. जबाबदार आणि चांगले नागरिक म्हणून राष्ट्रध्वजाचा मान–सन्मान राखणे हे आपले कर्तव्य आहे.‘‘विद्यार्थ्यांना प्रगतीचा सल्ला – अजित बोरा हिंदसेवा मंडळाचे चेअरमन अजित बोरा म्हणाले, ‘‘विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घेऊन प्रगती साधावी. शाळेचे, आई–वडिलांचे आणि देशाचे नाव उज्वल करावे. विविध स्पर्धांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन. सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा.’

## रामकरण सारडा विद्यार्थीगृहात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** माझे शिक्षण हिंद सेवा मंडळाच्या शाळेत झाले आहे. माजी विद्यार्थी असल्याने स्वातंत्र्यदिनी माझ्या हस्ते ध्वजारोहण होत आहे.याचा मला आनंद होत आहे. विद्यार्थ्यांनी चांगले गुणवत्तापूर्वक शिक्षण घ्यावे.यासाठी हिंद सेवा मंडळाने रामकरण सारडा विद्यार्थी गृहाची भव्य वास्तू उभारली आहे.रामकरण सारडा विद्यार्थी गृहाचे विद्यार्थी चांगले शिक्षण घेऊन उच्च पदस्थ अधिकारी म्हणून नोकरी करत आहे.येथील विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास करून आदर्श नागरिक व्हावे.असे प्रतिपादन हिंदसेवा मंडळाचे उद्योजक सचिन कटारिया यांनी केले आहे.

हिंद सेवा मंडळाच्या रामकरण सारडा विद्यार्थी गृहात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी उद्योजक सचिन कटारिया यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.याप्रसंगी प्रमुख उपस्थितीत उद्योजक मनोज राका,जितेंद्र बिहाणी, हिंदसेवा मंडळाचे ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा,चेअरमन शाम सुंदर सारडा,माजी कार्याध्यक्ष अजित बोरा,सारडा महाविद्यालयाचे जुनिअर कॉलेजचे चेअरमन मधुसूदन सारडा,विष्णू सारडा, दीपक बोथरा,प्रमोद सोळंकी,अभय लुंकड,मनीष ओस्तवाल, पुरुषोत्तम पटेल,सचिन चोपडा,बजरंग दरक,अविनाश बिहाणी,राहुल सारडा,दिलीप चंगेडिया,दीपक काबरा,सर्वेश बिहानी, संजय मुदगल,मुख्याध्यापक अशोक डोळसे,मंगला डोळस मॅडम,दीपक आरडे,वस्तीगृहाचे अधीक्षक बंडू भोसले आदींसह लक्ष्मीनारायण सत्संग मंडळाचे पदाधिकारी, दादा चौधरी विद्यालय व सिताराम सारडा विद्यालयाचे शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अनुराधा मिश्रा यांची श्रीलंकेत आमंत्रित आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत दमदार कामगिरी

**‘स्ट्राँग वुमन ऑफ इंटरनॅशनल’ किताबावर मोहोर; मास्टर वन महिला गटात मानाचा चषक पटकावला**
**अहिल्यानगरच्या कन्येने आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत उंचावला देशासह शहराचा नावलौकिक**




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील सावेडी परिसरातील अनुराधा रत्नेश मिश्रा यांनी श्रीलंकेतील कोलंबो येथे झालेल्या आमंत्रित आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करत उल्लेखनीय यश संपादन केले. महिलांच्या मास्टर वन विभागात दमदार कामगिरी करत त्यांनी ‘स्ट्राँग वुमन ऑफ इंटरनॅशनल’ हा मानाचा किताब आणि चषक पटकावला. त्यांच्या या यशामुळे आंतरराष्ट्रीय क्रीडा क्षेत्रात अहिल्यानगरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

श्रीलंका सरकार आणि संयुक्त भारतीय खेळ फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने या आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत तब्बल १२० देशांतील खेळाडूंनी सहभाग नोंदविल्याने स्पर्धेला मोठे आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले होते. विविध देशांतील बलाढ्य खेळाडूंच्या उपस्थितीत झालेल्या या स्पर्धेत अनुराधा मिश्रा यांनी आपल्या ताकदीचे आणि कौशल्याचे प्रभावी प्रदर्शन केले.

पॉवरलिफ्टिंगमधील तीन प्रमुख प्रकारांमध्ये अनुराधा मिश्रा यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांनी स्कॉटमध्ये १५० किलो, बेंच प्रेसमध्ये ११० किलो आणि डेडलिफ्टमध्ये १८० किलो, असे एकूण ४४० किलो वजन उचलले. प्रचंड स्पर्धात्मक वातावरणात एवढे वजन उचलत त्यांनी आपल्या शारीरिक सामर्थ्यासोबतच तांत्रिक कौशल्य, सातत्य आणि मानसिक तयारीचे दर्शन घडविले.

मास्टर वन महिला विभागात त्यांनी केलेल्या या दमदार कामगिरीची दखल घेत त्यांना ‘स्ट्राँग वुमन ऑफ इंटरनॅशनल’ या मानाच्या किताबाने गौरविण्यात आले. या यशाबद्दल त्यांना चषक देऊन सन्मानित करण्यात आले. श्रीलंकेच्या पश्चिम प्रांताचे माजी मुख्यमंत्री इसरु देवप्रिय पेरोरा यांच्या हस्ते अनुराधा मिश्रा यांना हा चषक प्रदान करण्यात आला.

अनुराधा मिश्रा यांचा आंतरराष्ट्रीय स्तरावरील हा पहिलाच मोठा पराक्रम नसून, यापूर्वी त्यांनी भूतान येथे झालेल्या आशियाई पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत सुवर्णपदकांची कमाई करत आपल्या गुणवत्तेची छाप उमटविली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर सातत्याने मिळणाऱ्या यशामुळे अनुराधा मिश्रा या भारतीय महिला पॉवरलिफ्टिंग क्षेत्रातील प्रभावी खेळाडू म्हणून पुढे येत आहेत. त्यांच्या या यशामागे महाराष्ट्राचे अध्यक्ष व शिवछत्रपती पुरस्कार विजेते तुषार दारकर, सचिव तथा शिवछत्रपती पुरस्कार विजेते संतोष शिंदे आणि राष्ट्रीय पंच निशा शिंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. मिश्रा या अहिल्यानगर शहरातील सावेडी परिसरातील ‘जिम स्ट्राईकर’ येथे प्रशिक्षक स्वप्निल मंडलिक यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित सराव करतात. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल क्रीडा क्षेत्रासह विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# तपस्येची अद्भुत साधना! सौ. मीनल ईश्वर बोरा यांच्या २१ उपवासांची पच्चक्खाण विधी आनंद तीर्थ समवशरणात संपन्न

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आचार्य सम्राट प. पू. आनंद ऋषिजी म. सा. यांच्या आनंद जन्मोत्सवानिमित्त तपस्येचा संकल्प करीत सौ. मीनल ईश्वर बोरा यांनी केलेल्या २१ निरंकार उपवासांच्या अखंड तपश्चर्येची पच्चक्खाण विधी आज आनंद तीर्थ समवशरण येथे अत्यंत भक्तिमय व आध्यात्मिक वातावरणात संपन्न झाली. ही पावन पच्चक्खाण विधी उपाध्याय प्रवर प. पू. श्री प्रवीण ऋषिजी म. सा. यांच्या मुखारविंदातून संपन्न झाली. यावेळी मधुर कंठी प. पू. श्री तीर्थेश ऋषिजी म. सा. यांचीही मंगलमय प्रेरणा लाभली, तर महाराष्ट्र प्रवर्तक प. पू. श्री कुंदन ऋषिजी महाराज साहेब यांच्या कृपाशीर्वादाने ही कठोर तपस्या पूर्णत्वास गेली.

समर्पण चातुर्मास समितीचे अध्यक्ष अशोक (बाबूसेठ) बोरा यांच्या पुत्रवधू असलेल्या सौ. मीनल ईश्वर बोरा यांनी गुरुभक्ती, श्रद्धा, संयम आणि आत्मशुद्धीची भावना मनात ठेवून ही २१ उपवासांची कठोर साधना पूर्ण केली. आचार्य सम्राट परम पूज्य आनंद ऋषिजी महाराज साहेब यांच्या आनंद जन्मोत्सवानिमित्त त्यांच्या चरणी तपस्या अर्पण करण्याचा भाव त्यांनी मनाशी धरला होता. त्या भावनेला गुरुभगवंतांच्या प्रेरणेची आणि आशीर्वादाची जोड लाभली आणि त्यांच्या तपस्येने भक्तिमय चातुर्मासातील आध्यात्मिक वातावरणाला आणखी एक वेगळी उंची प्राप्त झाली.

यावेळी उपाध्याय प्रवर परम पूज्य श्री प्रवीण ऋषिजी महाराज साहेब यांनी मीनलजींच्या



तपस्येचे विशेष कौतुक करत, ही तपस्या केवळ अन्न–पाण्याचा त्याग नसून मन, इंद्रिये आणि भावनांवर संयम ठेवत आत्मशुद्धीच्या दिशेने केलेली साधना असल्याचे सांगितले. श्रद्धा, धैर्य, सहनशीलता आणि दृढ संकल्प यांच्या बळावर त्यांनी २१ उपवास पूर्ण करून इतरांसमोरही तप–संयमाचा प्रेरणादायी आदर्श ठेवला आहे, अशा भावना गुरुदेवांनी व्यक्त केल्या.

“तपस्या ही शरीराला कष्ट देण्यासाठी नसून आत्म्याला निर्मळ करण्यासाठी असते. श्रद्धेने केलेली तपस्या जीवनाला अंतर्मुख करते आणि आत्मकल्याणाच्या मार्गावर पुढे घेऊन जाते,” या भावनेतून गुरुदेवांनी मीनलजींच्या तपश्चर्येचे अभिनंदन व अनुमोदना केली.

२१ दिवसांच्या या कठोर तपश्चर्येदरम्यान संयम, श्रद्धा, सहनशीलता आणि गुरुभक्तीचा परिचय देणाऱ्या सौ. मीनल ईश्वर बोरा यांच्या या तपस्येची उपस्थित भाविकांनी मनःपूर्वक अनुमोदना केली.

आनंद जन्मोत्सवाच्या पावन पर्वावर अर्पण केलेली ही २१ उपवासांची तपस्या म्हणजे गुरुभक्ती, आत्मसंयम आणि आत्मकल्याणाच्या भावनेतून साकारलेली एक प्रेरणादायी साधना ठरली आहे.

समर्पण चातुर्मास समितीचे ट्रस्टी अनिल पोखरणा, मनसुखजी गुंदेचा, आदेश चंगेडिया, विलास कटारिया, राजेश भंडारी, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, राजेंद्र बोरा व अभय गांधी यांनी यावेळी मीनल ईश्वर बोरा यांचा सन्मान केला तर प्रमुख लाभार्थी सौरभजी प्रमिलाबाई हेमराजजी बोरा यांच्या द्वारे तपस्वींना परम पूज्य आनंदऋषिजी म. सा. यांच्या पदचिन्हांचे अंकन असलेल्या चांदीच्या नाण्यांचे वितरण करून त्यांचा गौरव करण्यात आला.

# खरवंडी कासार येथे पुष्पवृष्ट्री अर्पण करत अखंड हरिनाम सप्ताहाचा प्रारंभ


(छाया– सतिष जगताप )

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**खरवंडी कासार–** श्रीक्षेत्र भगवान गडाचे महंत हभप डॉ.नामदेव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शना खाली राष्ट्रसंत जनार्धंन स्वामी महाराज अखंड हरिनाम सप्ताहास खरवंडी कासार येथे आज प्रारंभ झाला असून क्षेत्रभगवान गडाचे प्रधानाचार्य नारायन महाराज स्वामी यांच्या हस्ते विधीवत पुजा करत जनार्धंम स्वामी महाराज समाधी स्थळावर पुष्पवृष्टी अर्पन करण्यात आली मुख्याबाजार पेठेतुन तोफांच्या गजरात भगवान बाबा कि जय घोषणा देत नारायण महाराज स्वामी यांचे खरवंडी ग्रामस्थ वतीने भव्य स्वागत करण्यात आले संत जनार्धंनस्वामी समाधीस्थळ, मंदिर आकर्षक पुष्पांनी सजावट,मंदिर परिसर आकर्षक मंडप सुसज्य साऊंड सिस्टिम व्यवस्था करण्यात आली आहे.संत जनार्धन स्वामी संस्थाण महंत हरिपंडीत महाराज यांनी विधीवत मंत्रोचार करत पुजा केली यावेळी खरवंडी ग्रामस्थ वतीने नारायन स्वामी यांचा सन्मान करुण भक्तीमय वातावरणात सप्ताहास प्रारंभ झाला.

यावेळी खरवंडी कासार ग्रामस्थ महिला मोठ्या संख्येणे उपस्थित होत्या आज दि.१८रोजी सायंकाळी ९ ते ११ श्रीहरी पंडीत महाराज यांचे किर्तण संपन्न होणार आहे तरि खरवंडीकासार सह परिसरातील ग्रामस्थ भक्तगण यांनी किर्तणाचा लाभ घ्यावा असे अवाहन खरवंडी कासार ग्रामस्थ सप्ताह कमीटी यांनी केले आहे तसेच उद्या बुधवार दि. १९ रोजी सायंकाळी हभप वैष्णवी ताई मोरे (शिवकथाकार ,कल्याणस्वामी संस्थाण ,चकलांबा )दि .२० रोजी हभप माऊली महाराजशास्त्री (भगवानगड प्रतिनिधी ) दि .२१ रोजी हभप रामगिरी महाराज महंत येकेश्वर संस्थाण येळी दि २२ रोजी हभप ज्ञानेश्वरी दिदि अंदुरे (ज्ञानाई मुलिंची वारकरी शिक्षण संस्था आळंदी देवाची )दि.२३ रोजी हभप भागवताचार्य विजयाताई बनसोड (राधाकृष्ण मुलींची वारकरी शिक्षण संस्था श्री क्षेत्र पैठण )दि२४ रोजी हभप वैभव महाराज खाडे (भगवानगड प्रतिनिधी )दि२५ रोजी श्री क्षेत्र भगवानगडाचे महंत डॉ. नामदेव शास्त्री यांचे सप्ताह सांगता प्रसंगी सकाळी ८ वाजता खरवंडी येथे आगमन दर्शन सोहळा तर हभप विवेक महाराजशास्त्री महंत सिध्देश्वर संस्थाण शिरूर कासार यांचे १०ते १२ अमृत तुल्य काल्याचे किर्तन महाप्रसादाने सप्ताहाची सांगता आशि कार्यक्रमाची रूपरेषा आहे सप्ताह यशस्वी रित्या संपन्नतेसाठी ग्रामस्थ युवक सक्रिय झाले आहेत .सप्ताह निमित्त रोज सकाळी नाष्टा दुपार भोजन सायंकाळ भोजन आशि व्यवस्था करण्यात आली आहे.

# पाथर्डी तहसिलदार उध्दव नाईक यांना कार्यक्षम अधिकारी म्हणून जिल्हा स्तरावरून गौरव प्रदान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**खरवंडी कासार–** पाथर्डी तालुक्याचे नाव प्रशासकीय स्तरावर उंचावले असुन महसूल दिन २०२५ निमित्त गौरवपाथर्डी येथे संपन्न झाला पाथर्डीचे कार्यक्षम व आदरणीय तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी मा. श्री. उद्धव बाळकृष्ण नाईक यांची महसूल दिन – २०२५ निमित्त जिल्हास्तरावर उत्कृष्ट तहसीलदार म्हणून गौरवपूर्ण निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे संपूर्ण पाथर्डी तालुक्यातून आणि प्रशासकीय वर्तुळातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.खरवंडी कासार सजाच्या तलाठ्यांकडून विशेष सत्कार करण्यात आला तहसीलदार नाईक यांच्या या यशाबद्दल खरवंडी कासार सजाचे तलाठी विक्रमसिंग ब्रम्हनाथ यांनी तहसील कार्यालयात त्यांची भेट घेतली. याप्रसंगी तलाठी ब्रम्हनाथ यांनी तहसीलदार नाईक यांना आकर्षक पुष्पगुच्छ देऊन व शाल–श्रीफळ सह त्यांचा विशेष सन्मान केला आणि खरवंडी कासार सजाच्या वतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन केले.कर्तव्यनिष्ठेचा आणि लोकाभिमुख कारभाराचा सन्मान तहसीलदार उद्धव बाळकृष्ण नाईक यांनी आपल्या कार्यकाळात पाथर्डी तालुक्यात अत्यंत पारदर्शक, लोकाभिमुख आणि गतिमान कारभार केला आहे. महसूल विभागाशी संबंधित सामान्य जनतेचे प्रश्न,



(छाया– सतिष जगताप )

शेतकरी बांधवांचे सातबारा, फेरफार तसेच विविध शासकीय दाखल्यांचे काम वेळेत पूर्ण करण्यावर त्यांनी नेहमीच भर दिला. शासकीय योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्यांच्या याच उत्कृष्ट प्रशासकीय सेवेची दखल घेऊन शासनाकडून त्यांना या मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. कार्यालयीन कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरणया प्रतिष्ठेच्या निवडीची घोषणा होताच पाथर्डी तहसील कार्यालयात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. महसूल विभागातील सर्व दुय्यम अधिकारी, मंडळ अधिकारी आणि तलाठी बांधवांनी तहसीलदार नाईक यांचे कौतुक केले आहे. सामान्य नागरिकांच्या हितासाठी अहोरात्र झटणाऱ्या एका कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याला हा पुरस्कार मिळाल्यामुळे पाथर्डी तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

# ढवळपुरी केंद्रातील सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये लेखन फळ्यांचे वाटप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर/ ढवळपुरी–** भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून ढवळपुरी केंद्रातील सर्व जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना लेखन फळ्यांचे वाटप करण्यात आले. युवा उद्योजक व माहिती–तंत्रज्ञान अभियंता श्री. प्रविणजी फलके यांच्या संकल्पनेतून तसेच युवा फाउंडेशन, ढवळपुरी यांच्या माध्यमातून हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला. ढवळपुरी केंद्रातील विविध वस्ती व गावांमधील जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांना लेखन फळ्या वितरित करण्यात आल्या.

लेखन फळ्या हातात मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद व उत्साह पाहायला मिळाला.या उपक्रमातून केवळ शैक्षणिक साहित्याचे वाटप न करता विद्यार्थ्यांनी शिकावे, पुढे जावे आणि आपल्या गावाचे नाव उज्ज्वल करावे, हा सकारात्मक संदेश देण्यात आला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साधने उपलब्ध करून देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे, या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. ढवळपुरी केंद्रातील रानमळा, चितळकर वस्ती, दरेकरवाडी, भनगडेवाडी, वाघवाडी, गावडेवाडी, माळवाडी, कुटेवाडी, मुसलमानवाडी, भोकरदरा, ठाकरवाडी, पवारवाडी, सुतारवाडी, लमाण तांडा, हेमलाचा तांडा, ढवळपुरी, हनुमानवाडी आणि खारवाडी येथील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा लाभ मिळाला.

स्वातंत्र्य दिन हा केवळ ध्वजारोहण आणि राष्ट्रगीतापुरता मर्यादित न राहता शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि पुढील पिढीच्या उज्ज्वल भविष्यासाठी योगदान देण्याचा दिवस ठरावा, या उद्देशाने युवा फाउंडेशनने घेतलेला हा उपक्रम कौतुकास्पद ठरला आहे.

यावेळी विविध शाळांमधील शिक्षक, विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ तसेच शिक्षणप्रेमी नागरिक उपस्थित होते. सर्वांनी या उपक्रमाचे स्वागत करत श्री. प्रविणजी फलके आणि युवा फाउंडेशन, ढवळपुरी यांचे अभिनंदन केले.

“आज एका विद्यार्थ्याच्या हातात लेखन फळी दिली, तर उद्या त्याच हातात यशाची संधी असेल,” या विचारातून राबविण्यात आलेला हा उपक्रम ढवळपुरीच्या शैक्षणिक वाटचालीतील प्रेरणादायी पाऊल ठरला आहे.

# बिडकीनच्या पाच मृत तरुणांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी एक लाखांची मदत

**मुख्यमंत्री अर्थसहाय्यता निधीतून आर्थिक आधार; जिल्हाधिकारी कार्यालयात मदत सुपूर्द**

**दैनिक आकर्षण । हारून शेख**

**पैठण–** गणपतीपुळे (जि. रत्नागिरी) येथे काही दिवसांपूर्वी बिडकीन येथील पाच तरुणांचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाला होता. या घटनेमुळे पाचही कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला. या संकटाच्या काळात राज्य शासनाने पीडित कुटुंबीयांना आर्थिक आधार देत मुख्यमंत्री अर्थसहाय्यता निधीतून प्रत्येकी एक लाख रुपयांची मदत मंजूर केली.

जिल्हाधिकारी कार्यालयात संबंधित कुटुंबीयांकडे या मदतीची रक्कम सुपूर्द करण्यात आली.



शासनाच्या या मदतीमुळे दुःखाची भरपाई होणार नसली तरी संकटाच्या काळात कुटुंबीयांना मोठा आधार मिळाला आहे. गणपतीपुळे येथील दुर्घटनेने बिडकीन परिसरावर शोककळा पसरली होती. या घटनेनंतर शासनाने तातडीने मदतीचा निर्णय घेत पीडित कुटुंबीयांना दिलासा दिला. कुटुंबीयांना आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## रात्रीच्या अंधारात अवैध वाळू वाहतूक; पैठणमध्ये ‘हायवा’ची धावपळ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** शहर व परिसरात रात्री उशिरापर्यंत अवैध वाळू वाहतूक सुरू असल्याचा प्रकार समोर आला आहे. गोदावरी नदीपात्रातून तसेच गावातील विविध ठिकाणांहून जेसीबी, ट्रॅक्टर व रोडरच्या साहाय्याने वाळू उपसा करून तिचे बेकायदा अवैध मार्गाने विक्री करण्यात येत असल्याची चर्चा नागरिकांत आहे. गेल्या आठवडाभरात अवैध वाळू वाहतुकीचा हा दुसरा प्रकार असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. रात्रीच्या वेळी शहरातील रस्त्यांवर हायवा वाहनांची मोठ्या प्रमाणात ये–जा सुरू असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, ‘एक दिवसासाठी’ पैसे घेऊन वाळू वाहतुकीला परवानगी दिली जात असल्याची दबक्या आवाजात चर्चा आहे. या कथित ‘एक दिवसाच्या डब्यात’ महसूल व पोलिस प्रशासनाच्या संबंधितांना किती रक्कम दिली जाते, याबाबत मात्र कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे या प्रकाराची वरिष्ठ पातळीवरून चौकशी करण्याची मागणी होत आहे. अवैध वाळू उपसा व वाहतुकीमुळे गोदावरी नदीपात्राचे नुकसान होण्याबरोबरच शासनाच्या महसुलावरही परिणाम होत आहे. रात्रीच्या वेळी बिनधास्त सुरू असलेल्या या वाहतुकीला लगाम घालण्यासाठी महसूल व पोलिस प्रशासन कठोर कारवाई करणार का, असा सवाल पैठणकरांकडून उपस्थित केला जात आहे.

(पान १ वरून)

## मुकुंदनगरमध्ये निवासी भागात अनधिकृत ‘नूर लॉन्स’चा गाजावाजा

असल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे तक्रारीत नमूद होते.प्राप्त तक्रारीवरून प्रत्यक्ष जागेची पाहणी केली असता, ॲमेनिटी जागेत ‘नूर लॉन्स’चा बोर्ड लावून बेकायदेशीर वापर सुरू असल्याचे उघडकीस आले. यावर नगररचनाकारांकडून अभिप्राय मागवला असता, एकीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० नुसार सदर भूखंडावर केवळ कन्व्हेन्शन सेंटरसाठी परवानगी देण्यात आल्याचे स्पष्ट झाले. या व्यतिरिक्त लॉन्स किंवा मंगल कार्यालयासाठी वापर करणे पूर्णपणे बेकायदेशीर आहे. त्यामुळे सदर जागेतील ‘नूर लॉन्स’चा वापर तात्काळ थांबवावा, अन्यथा नियमानुसार कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा नगररचना सहाय्यक संचालकांनी दिला आहे.

## व्यापारी पतसंस्थेच्या उपाध्यक्षपदी अर्जुन हिवरकर यांची एकमताने निवड

उत्तम डाके यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवडणूक खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. निवडणूक अधिकारी म्हणून सहकार अधिकारी श्रेणी–१, श्रीगोंदा येथील भाऊसाहेब सिनारे यांनी, तर सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून संस्थेचे सचिव किसन वऱ्हाडे यांनी कामकाज पाहिले.या वेळी संस्थेचे अध्यक्ष उत्तम डाके, मार्गदर्शक संचालक सोपान हिरवे, युवराज पवार, अरुण काळाणे, दौलतराव भोसले, दीपक कोद्रे, अनिल शेलार, बांदल पितळे , राजेंद्र साळवे, शिवाजी श्रीराम, वैशाली शेलार, लता घोडेकर, सचिव किसन वऱ्हाडे, सावता घोडेकर यांच्यासह मान्यवर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाकचौरे यांच्या नेतृत्वात श्रीरामपुरात अंमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियान

चंद्ररूप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर येथे आयोजित करण्यात आल्या. त्यांचे उद्घाटन रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, मा. मीनाताई जगधने यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी श्री. विशाल खैरे, पोलीस निरीक्षक श्रीरामपूर शहर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानावरून मनोगत व्यक्त करताना मा. मीनाताई जगधने यांनी नशामुक्त भारत करण्यासाठी अशा निबंध स्पर्धा अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन केले व निबंध स्पर्धेला शुभेच्छा दिल्या. श्री. विशाल खैरे यांनी आपल्या मनोगतात पोलीस विभाग नशामुक्त भारत अभियानासाठी करत असलेल्या अथक परिश्रमाबद्दल माहिती दिली व तरुणाईला सकारात्मक ऊर्जा देण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन केले असल्याचे सांगितले. प्रास्ताविकात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय कांबळे यांनी रयत शैक्षणिक संकुलाच्या वतीने निबंध स्पर्धेसाठी आलेल्या सर्व शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे स्वागत केले व नशा मुक्त भारत अभियानासाठी आपण सर्व भारतीय कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली. डॉ. डी. काचोळे विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. सुनील साळवे यांनी सदर निबंध स्पर्धेचे यशस्वी संयोजन केले. या निबंध स्पर्धेत एकूण ५१८ निबंध स्पर्धकांनी भाग घेतला. कार्यक्रमासाठी श्री. दीपक त्रिभुवन, गट शिक्षणाधिकारी, श्रीरामपूर, श्रीमती शितल मुगडे, पोलीस निरीक्षक, श्री. रोशन निकम, पोलीस उपनिरीक्षक, एस. के. सोमय्या शाळेच्या मुख्याध्यापिका, सो. सोनाली पेठणे, उपप्राचार्य, डॉ. अनिकेत खत्री, विभागप्रमुख प्रा. विजय नागपुरे व प्रा. योगीराज चंद्रात्रे, प्रा. सारिका ऐरणे, प्रा. मयुरी जेजुरकर, प्रा. तृप्ती कोरडे, प्रा. संतोष तांबे व तालुक्यातील बहुसंख्या शाळा व महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख, डॉ. पोर्णिमा गुजर यांनी केले तर आभार प्रा. डॉ. संतोष धंगाळे यांनी व्यक्त केले. याच अभियाना अंतर्गत उद्या दि. १९/०८/२०२६ रोजी डी. डी. काचोळे, विद्यालय, श्रीरामपूर येथे चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. दि. २०/०८/२०२६ रोजी वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे, तर एस.के. सोमय्या शाळेत रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. तर दिनांक २१/०८/२०२६ रोजी सकाळी ०७.३० वा. आर.बी. एन.बी. कॉलेज मैदान येथून जनजागृती रॅली काढण्यात येणार आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी तसेच शाळा, विद्यालय व महाविद्यालय यांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन.

## दाळमंडई - आडतेबाजार परिसरात वाहनांवर होणारी दंडात्मक कारवाई थांबवा

अरुंद रस्ते, चौकाचौकात असलेली अतिक्रमणे यासह अन्य बाबी देखील कारणीभूत आहेत. वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून या भागात ट्राफिक पोलीस अथवा ट्राफिक वार्डन यांची नेमणूक करणे आवश्यक आहे. केवळ वाहन चालकांकडून विविध कलमान्वये हजारो रुपयांचा दंड वसूल करून ही समस्या सुटणारी नाही. वाहनचालकांच्या रोजच्या कमाई पेक्षा दंडाची रक्कम ही कितीतरी पटीने जास्त असते. मोठ्या रकमांच्या दंडामुळे वाहन चालक त्रस्त झाले आहेत. काही वाहनचालक मोठ्या दंडाच्या रकमेमुळे रडताना देखील दिसतात. प्रत्येक वाहनचालक शासनाला विविध प्रकारचे कर भरत असतो. दाळमंडई – आडते बाजार या शहराच्या मुख्य बाजारपेठेतील दररोजच्या कोट्यावधी रुपयांच्या उलाढालीतून शासनाला मोठ्या प्रमाणात कररूपी महसूल देखील मिळतो. त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी व रहदारी सुरळीत करण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. रहदारीचे नियमांचे स्वरूप व या परिसरातील प्रत्यक्ष वस्तुस्थिती याचा विचार करून दाळमंडई – आडतेबाजार परिसरात वाहनांवर होणारी दंडात्मक कारवाई थांबवणे व वाहन चालकांना दिलासा देण्याच्या दृष्टीने आपण संबंधितांना योग्य त्या सूचना द्याव्यात, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

## मराठा समाजाला कुणबी मान्य करणे म्हणजे सामाजिक मूर्खपणा - हाके

अजित पवार यांनी एसीबीसीचे आरक्षण कशासाठी आणलं? सरकार आमची मागणी मान्य करायला तयार नाही, विरोधक आमचा प्रश्न मांडत नाहीत दिनांक १ सप्टेंबरच्या मोर्चात सर्वांनी सहभागी व्हावे, जाती–जातीत भांडण करत बसू नका. ओबीसी आरक्षणातून हद्दपार झाला आहे, आपल्याला ते आरक्षण वाचवायचे आहे, असे ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी म्हटले आहे. मुख्यमंत्री साहेब, मराठा समाजाच्या स्पर्धांमध्ये ओबीसी टिकू शकेल का?राधाकृष्ण विखे पाटलांसारखी माणसं ओबीसीचे दाखले काढत असतील तर ओबीसीचा आरक्षण कसं राहील हे सांगा? कुठे गेला पुरोगामी महाराष्ट्र, आंबेडकरांचा महाराष्ट्र?, असा सवाल करून लक्ष्मण हाके म्हणाले की, ओबीसी नेत्यांनाच नव्हे तर भाजपालासुद्धा निवडणूक आली की ओबीसी हवा आहे. मुख्यमंत्र्यांना माझं सांगणे आहे की, २२ लाख २० हजार ५७७ कुणबी प्रमाणपत्र वाटली गेली. मराठा समाजाचे मागासपण नाकारला गेलं तरी पण तुम्ही हे प्रमाणपत्र वाटले आहेत. मग ओबीसीचे आरक्षण कसे टिकेल, हे मुख्यमंत्र्यांनी सांगावे, असे म्हणून ओबीसी प्रमाणपत्राबद्दल लक्ष्मण हाके यांनी मुख्यमंत्र्यांवर संताप व्यक्त केला.

## बाबासाहेब बोडखे यांचा आमदार अक्षय कर्डिले यांच्या हस्ते सत्कार

स्वीकारून त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचे काम त्यांनी केले आहे. शाळेच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करून केवळ वृक्षलागवडीपुरते मर्यादित न राहता त्या वृक्षांचे संगोपन करण्यावरही त्यांनी भर दिला आहे. पर्यावरण संवर्धनासोबतच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक आणि पर्यावरणविषयक जाणीव निर्माण करण्यासाठी त्यांनी विविध उपक्रम राबविले आहेत. दरवर्षी शाळेतील विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देत गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील अडथळे दूर करण्यासाठी ते प्रयत्नशील असतात. त्यामुळे शिक्षक म्हणून ज्ञानदानाचे कार्य करत असतानाच सामाजिक जाणीव आणि बांधिलकी जपणारा शिक्षक म्हणून बाबासाहेब बोडखे यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे, असे आमदार कर्डिले यांनी नमूद केले. सत्काराला उत्तर देताना बाबासाहेब बोडखे यांनी आमदार अक्षय कर्डिले तसेच उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. शिक्षकांच्या प्रश्नांसाठी काम करताना सहकाऱ्यांचे मिळालेले सहकार्य, मार्गदर्शन आणि विश्वास यामुळेच संघटनात्मक कार्याला बळ मिळाले असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी यापुढेही प्रामाणिकपणे आणि सातत्याने काम करण्याचा निर्धार व्यक्त करताना त्यांनी माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या माध्यमातून सभासदांच्या हिताला प्राधान्य देणार असल्याचे सांगितले. तसेच मुख्याध्यापक म्हणून शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसोबतच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, शिस्त, संस्कार, पर्यावरण संवर्धन आणि विविध शैक्षणिक उपक्रमांना चालना देण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.